शहर परिसर

भूमी अभिलेखच्या सेवा दुरुस्तीसाठी बंद

पुणे : संगणकीय प्रणालीच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठी भूमी अभिलेख आणि महसूल विभागाच्या सर्व ऑनलाइन सेवा गुरुवारपासून (ता. २) रविवारदरम्यान (ता. ५) तात्पुरत्या स्वरूपात बंद राहणार आहेत. या तांत्रिक कामामुळे नागरिकांना डिजिटल स्वाक्षरीचे उतारे, प्रॉपर्टी कार्ड आणि इतर ऑनलाइन सुविधांचा लाभ घेता येणार नाही. यासंदर्भात प्रभारी अप्पर जमाबंदी आयुक्त विकास गजरे यांनी पत्र प्रसिद्धीस दिले आहे. महाभूमी पोर्टल आणि भूमी अभिलेख विभागाचा डिजिटल सातबारा, ८-अ उतारा, मालमत्ता पत्रक, जमीन मोजणीची 'क' प्रत मिळवणे, फेरफार नोंदी, नोंदणी व मुद्रांक विभागाशी संबंधित काही महसूल सेवा पूर्णपणे बंद राहणार आहेत.

योगिनी जोगळेकर यांना स्वरवंदना

पुणे : ज्येष्ठ लेखिका व गायिका योगिनी जोगळेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष सांस्कृतिक मैफल टिळक स्मारक मंदिरात नुकतीच उत्साहात झाली. सांस्कृतिक कार्य विभागाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या मैफलीत गायिका मधुवंती बोरगावकर, तबलावादक रामदास पळसुले आणि गायक उपेंद्र भट यांनी सादरीकरणातून जोगळेकर यांना संगीतबद्ध अभिवादन केले. यावेळी गीत, साहित्य, निवेदन आणि दृकश्राव्य माध्यमांतून जोगळेकर यांच्या बहुआयामी कार्याचा आढावा घेतला. त्यांच्या साहित्यिक व सांस्कृतिक योगदानाचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार केला. रत्ना दहिवेलकर यांनी सूत्रसंचालन केले.

'डॉ. आंबेडकर जयंती डीजेमुक्त साजरी करा'

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती डीजेमुक्त साजरी करण्यासाठी जनजागृती करण्याचे आवाहन कॅटलिस्ट फाउंडेशनचे संस्थापक सुनील माने यांनी केले आहे. जयंती उत्साहात साजरी होत असली तरी डीजेच्या वाढत्या वापरामुळे सामाजिक व आरोग्यविषयक समस्या निर्माण होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. डीजेच्या अतिआवाजामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून अपघातांच्या घटनाही घडत असल्याचे त्यांनी नमूद केले. यासाठी डीजेवर बंदी घालण्याच्या मागणीसंदर्भात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली.

भाजप इच्छुकांच्या स्वप्नांना कात्री

पुण्यात स्वीकृत नगरसेवकांना पाच वर्षांचे नियुक्ती प्रमाणपत्र

पुणे, ता. १ : महापालिकेतील स्वीकृत नगरसेवकांना अडीच वर्षांऐवजी थेट पाच वर्षांच्या मुदतीचे नियुक्ती प्रमाणपत्र मिळाल्याने भाजपमधील अनेक इच्छुकांची संधी हुकली आहे. पक्षाने अडीच वर्षांचा शब्द दिल्याने पुढील काळात संधी मिळण्याची आशा असलेल्या कार्यकर्त्यांचा यामुळे हिरमोड झाला आहे.

महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपमध्ये इच्छुकांची संख्या प्रचंड होती. अनेक निष्ठावंतांची उमेदवारी कापली. त्यामुळे त्यांच्यात नाराजी पसरली होती. निवडणुकीनंतर ज्यांना उमेदवारी नाकारण्यात आली, त्यांना स्वीकृत नगरसेवकपदी संधी देण्याचा निर्णय झाला. यामध्ये नीलेश कोंढाळकर, राजेंद्र काकडे, रवींद्र साळेगावकर, विश्वास ननावरे, उदय लेले यांना भाजपतर्फे संधी दिली आहे; तर काँग्रेसकडून सुनील शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसकडून दत्ता धनकवडे, राकेश कामठे यांना संधी दिली. भाजपने जयप्रकाश पुरोहित आणि प्रियांका शेंडगे यांनाही संधी दिली. मात्र, त्यांचे अर्ज बाद झाले होते. त्यांच्यासाठी आता पुन्हा नव्याने प्रक्रिया राबवली जाईल.

भाजपकडे स्वीकृत नगरसेवकपदासाठी इच्छुकांची संख्या जास्त असल्याने प्रत्येकाला अडीच वर्षांचा कालावधी दिला जाईल. त्यामुळे पाच वर्षांत १४ जणांना संधी मिळेल. पराभूत झालेल्यांना संधी मिळणार नाही, असे भाजपने कार्यकर्त्यांना सांगितले होते. त्यामुळे त्यांनी सात जणांना संधी दिली. त्यापैकी पाच जणांची निवड झाली. या पाच जणांना महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी अडीच वर्षांऐवजी पाच वर्षे मुदतीचे प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे ज्यांना या वेळी संधी मिळाली नाही, त्यांना आता पुढील पाच वर्षेही स्वीकृत नगरसेवकपदासाठी संधी मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

> स्वीकृत नगरसेवकपदासाठी जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना संधी मिळावी, यावर पक्षात चर्चा झाली होती. मुदतीबाबतचा अंतिम निर्णय आगामी काळात घेतला जाऊ शकतो.
> **- धीरज घाटे,** शहराध्यक्ष, भाजप

अतिरिक्त आयुक्तसाठी पुण्यात चार नावे चर्चेत

पुणे, ता. १ : महापालिकेतील अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या जागेवर महापालिका सेवेतील अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. या पदासाठी उपायुक्त अविनाश सपकाळ, माधव जगताप, विजय लांडगे आणि मुख्य लेखापाल उल्का कळसकर यांची नावे चर्चेत आहेत. महापालिकेत अतिरिक्त आयुक्तांच्या तीन जागांपैकी एका जागेवर महापालिका सेवेतील अधिकाऱ्याची नियुक्ती होऊ शकते. उर्वरित दोन जागा भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) अधिकाऱ्यांसाठी असतात. फेब्रुवारीमधील शासन निर्णयानुसार, १५ वर्षांचा अनुभव आणि उत्कृष्ट गोपनीय अहवाल असलेले अधिकारी या पदासाठी पात्र ठरतात. सध्या रिक्त झालेल्या जागेवर महापालिका सेवेतील अधिकाऱ्याला संधी मिळावी, यासाठी विभागीय पदोन्नती समितीच्या (डीपीसी) निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पदपथ दुरुस्तीसाठीही कमी दराच्या निविदा

पुणे महापालिकेच्या स्थायी समितीपुढे प्रस्ताव

पुणे, ता. १ : नालेसफाईच्या कामापाठोपाठ आता पदपथांच्या दुरुस्ती कामाच्या निविदादेखील कमी दराने येऊ लागल्या आहेत. नगर रस्त्यावरील पदपथांच्या दुरुस्तीसाठी तब्बल ३७ टक्के कमी दराने निविदा आली आहे. इतक्या कमी दरामधील निविदांद्वारे दुरुस्तीच्या कामाचा दर्जा साध्य होतो का? की दुरुस्तीच्या नावाखाली पुणेकरांचा पैसा लाटण्याचा प्रकार होत आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

महापालिकेकडून पावसाळ्यापूर्वीच्या नालेसफाईची कामे करण्यासाठी निविदा काढल्या जातात. त्या ३५ ते ४० टक्के इतक्या कमी दराने येत आहेत. अशा कमी दराच्या निविदांमधून निकृष्ट दर्जाची कामे होतात किंवा नालेसफाई दुरुस्तीच्या नावाखाली ठेकेदार-अधिकाऱ्यांकडून पैसे लाटण्याचे प्रकार घडतात. पावसाळ्यापूर्वीच्या नालेसफाईच्या कामांपाठोपाठ आता पदपथ दुरुस्तीच्या कामांमध्येही कमी दराने निविदा दाखल होऊ लागल्या आहेत. नगर रस्ता येथील पदपथांच्या दुरुस्ती कामाचा प्रस्ताव महापालिकेच्या स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे. पदपथ दुरुस्तीच्या कामाची एकूण रक्कम ८३ लाख ३५ हजार इतकी आहे. संबंधित काम मिळविण्यासाठी १४ ठेकेदारांनी निविदा प्रक्रियेद्वारे भाग घेतला होता. त्यापैकी बी. एन. चव्हाण या ठेकेदाराची निविदा ३६.९९ टक्के इतक्या सर्वाधिक कमी दराने आली. त्यामुळे संबंधित ठेकेदाराला पदपथ दुरुस्तीचे काम देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने स्थायी समितीसमोर ठेवला. ८३ लाख रुपयांचे काम संबंधित ठेकेदार ५२ लाख रुपयांमध्येच करणार आहे. त्याबाबत स्थायी समितीच्या बैठकीमध्ये निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

> पदपथ दुरुस्तीसाठी कमी दराने निविदा दाखल होते, याचा अर्थ पूर्वगणकपत्र चुकत आहे. तेवढ्या किमतीचे किंवा दर्जेदार काम होणार नाही, हे स्पष्ट होते. थोडक्यात कमी दराच्या निविदा दाखल करून महापालिकेचा निधी लाटण्याचा प्रकार आहे.
> **- ॲड. नीलेश निकम,** विरोधी पक्षनेते, महापालिका

ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, प्राधिकरण : महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीतर्फे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सत्कार समारंभात आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत कांदिवलीतील कामगार रुग्णालयाचाही गौरव केला.

'ईएसआयसी' देशात सर्वोत्तम असावे

आबिटकर : राज्य कामगार सोसायटीतर्फे कर्मचाऱ्यांचा सत्कार

पिंपरी, ता. १ : ''राज्यातील महाराष्ट्र राज्य कामगार विमा महामंडळ (ईएसआयसी) देशातील सर्वोत्तम असावे. त्यासाठी महामंडळाची स्वतंत्र प्रशिक्षण संस्था उभी करावी. यातून आपण देशातले सर्वांत चांगले काम करू,'' असा विश्वास राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी मांडले.

निगडी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे आयोजित महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीच्या उत्कृष्ट अधिकारी आणि कर्मचारी सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी सोसायटीचे आयुक्त रमेश चव्हाण, संचालक डॉ. अशोक थोरात, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दयानंद थोरात, संचालक सोहम वायाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

''येथून पुढे दरवर्षी हा पुरस्कार दिला जाणार आहे. तुमच्या सगळ्यांच्या जीवावर या राज्याच्या लोकांच्या आरोग्याची जबाबदारी घेत आहोत. हे सेवेचे काम आहे. त्यासाठी लागेल ते देण्याची जबाबदारी शासनाची आहे,'' असे आबिटकर म्हणाले.

कामगार विमा योजनेचा लाभ सर्वांपर्यंत पोचविण्यासाठी कामगिरी करणाऱ्या राज्यभरातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी आबिटकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. वायाळ यांनी प्रास्ताविकातून सोसायटीच्या कामाची माहिती दिली.

'आरोग्यसंपन्न गाव लोकचळवळ बनावी'

पुणे, ता. १ : तरुण वयात कर्करोग, मधुमेह, रक्तदाब झालेला पाहताना अंगावर काटा येतो. हे टाळण्यासाठी नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागृती झाली पाहिजे. 'माझे गाव, आरोग्यसंपन्न गाव' ही एक व्यापक लोकचळवळ बनावी आणि लोकसहभागातून राज्यभर आरोग्याचा जागर व्हायला हवा,'' अशी अपेक्षा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केली.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी नऱ्हातील श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालयात 'माझं गाव-आरोग्यसंपन्न गाव' या विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बुधवारी होते.

या वेळी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, ई. रविंद्रन, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसंचालक डॉ. भगवान पवार, सिंहगड इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. मारुती नवले व विविध जिल्ह्यांतून आरोग्य विभागाचे अधिकारी, सरपंच आदी उपस्थित होते.

आबिटकर म्हणाले...

- या अभियानात ग्रामीण भागाचा चेहरा-मोहरा बदलणार
- लोकसहभाग वाढवत व्यापक आरोग्य चळवळ निर्माण करायची आहे.
- निरोगी जीवनशैलीच्या दृष्टिकोनातून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा
- अभियानाच्या यशासाठी आरोग्य विभागामार्फत आवश्यक सहकार्य

खासगी प्रशिक्षण संस्थांतील गैरव्यवहाराची आता चौकशी

'बार्टी'कडून समिती स्थापन; अहवाल देण्याचे आदेश

शिवाजीनगर, ता. १ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमात मोठ्या गैरव्यवहाराच्या आरोपांनी गंभीर वळण घेतले आहे. संबंधित खासगी प्रशिक्षण संस्थांकडून नियमांचे उल्लंघन, आर्थिक आमिष आणि बेकायदा जाहिरातींचा वापर केल्याच्या तक्रारीनंतर 'बार्टी प्रशासना'ने चारसदस्यीय चौकशी समिती नेमली आहे.

विद्यार्थी संघटनेच्या तक्रारीच्या अनुषंगाने, 'खासगी संस्थांना बार्टीकडून अभय?' असे वृत्त 'सकाळ'मध्ये शनिवारी (ता. २८) प्रसिद्ध केले होते. बार्टीकडे प्राप्त झालेल्या तक्रारी आणि वृत्ताची दखल घेत, बार्टीकडून संबंधित संस्थांच्या चौकशीसाठी समिती नेमली आहे. महासंचालक (प्रभारी) दीपा मुधोळ-मुंडे यांच्या आदेशानुसार, ३० मार्चला ही चौकशी समिती स्थापन केली असून, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष अमोल यादव, उपायुक्त संजय दाणे, उपायुक्त (नियोजन) विजय गायकवाड आणि समाज कल्याण विशेष अधिकारी किशोर बडगुजर यांचा समितीत समावेश आहे. या समितीला दहा दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, २०२५-२६ साठी राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमात संबंधित विविध संस्थांकडून विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी आर्थिक प्रलोभने दाखविली जात असल्याचे आरोप आहेत. यासंदर्भात नॅशनल स्टुडंटस युनियन ऑफ इंडिया (एनएसयूआय) यांनी १६ जानेवारीला पुराव्यासह तक्रार दाखल केली होती.

> महासंचालकांच्या आदेशानुसार, चौकशी समिती नेमण्यात आली असून, दोषी आढळणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई केली जाईल. चौकशी समितीने दहा दिवसांत चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.
> **- डॉ. सुचिता शिंदे,** निबंधक, बार्टी

> गेल्या दोन महिन्यांपासून आम्ही फोन 'रेकॉर्डिंग'सह ठोस पुरावे सादर करत आहोत. तरीही कोणतीही ठोस कारवाई होत नाही. प्रशासन जाणूनबुजून वेळकाढूपणा करत असून, काही संस्थांना वाचविण्याचा प्रयत्न सुरू आहे. संबंधित संस्थांची सायबर आणि फॉरेन्सिक चौकशी झाली पाहिजे. तसेच, दप्तरदिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे.
> **- ॲड. कृष्णा साठे,** प्रदेश महासचिव, एनएसयूआय

राज्यातील चार कृषी विद्यापीठांना दोन कोटींचा निधी

पुणे, ता. १ : राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता नाविन्यता व इन्क्युबेशन केंद्र स्थापन करण्यासाठी राज्य सरकारने दोन कोटी रुपयांच्या निधीला मान्यता दिली आहे. या निर्णयानुसार प्रत्येक कृषी विद्यापीठाला ५० लाख रुपयांचा निधी दिला जाणार आहे.

राज्य सरकारच्या महाॲग्री-एआय धोरण २०२५-२९ अंतर्गत राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ (राहुरी), डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ (अकोला), वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (परभणी) आणि डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ (दापोली) या चारही विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता नाविन्यता आणि इन्क्युबेशन केंद्र स्थापन करण्यासाठी दोन कोटी रुपयांच्या खर्चास वित्तीय मान्यता दिली. हा निधी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत कृषी विद्यापीठांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

नव्या कारभाऱ्यांनी स्वीकारला पदभार

महाराष्ट्र साहित्य परिषद : १६ एप्रिलला पहिली बैठक

पुणे, ता. १ : महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नवनियुक्त कार्यकारिणीने बुधवारी अधिकृत पदभार स्वीकारला. त्यामुळे परिषदेत दहा वर्षांनंतर नवे कारभारी विराजमान झाल्याचे पाहायला मिळाले. नव्या कार्यकारिणीची पहिली बैठक १६ एप्रिलला होणार असल्याचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी बुधवारी सांगितले.

पदभार स्वीकारल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याप्रसंगी कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, कार्यवाह सुनील महाजन, डॉ. नितीन संगमनेरकर उपस्थित होते. ''कार्यकारिणीच्या पहिल्या बैठकीत चार उपाध्यक्ष, दोन स्वीकृत सदस्य, दोन विभागीय कार्यवाह यासह मसाप साहित्य पत्रिकेच्या संपादकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. या बैठकीनंतर आजीव सभासद नोंदणीलादेखील सुरुवात करण्यात येईल,'' असे सोमण यांनी सांगितले.

या बैठकीसाठी संस्थेचे पुण्यातील पदाधिकारी तसेच ११ जिल्ह्यातील प्रतिनिधींना निमंत्रण पाठविण्यात आले आहे. यावेळी प्रतिनिधींना निवडीचे प्रमाणपत्र देण्यात येईल. या बैठकीनंतर पंधरा दिवसांनी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची बैठक आयोजित करण्यात येईल, या बैठकीसाठी परिषदेकडून महामंडळाच्या उपाध्यक्षांना प्रस्ताव देण्यात येणार आहे. या बैठकीत साहित्य परिषदेचे अध्यक्ष, प्रमुख कार्यवाह आणि कोषाध्यक्ष महामंडळाच्या याच तीन पदांचा पदभार स्वीकारतील, अशी माहिती सोमण यांनी दिली. ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या स्मृतीदिनी १० एप्रिलला कमला नेहरू उद्यानातील त्यांच्या पुतळ्याला परंपरेप्रमाणे अभिवादन करण्यात येईल. नवीन कार्यकारिणी मंडळाचा हा पहिला कार्यक्रम असेल, असे सोमण यांनी नमूद केले. कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये सभासद नोंदणीच्या प्रस्तावाला मंजुरी घेऊन ही प्रक्रिया सुरू करण्यात येईल. संस्थेच्या घटना दुरुस्तीनुसार आजीव सभासद शुल्क आता एक हजार रुपयांऐवजी चार हजार रुपये, असे करण्यात आले आहे. सध्या मात्र या शुल्काप्रमाणेच आजीव सभासद नोंदणीला सुरुवात होईल, अशी माहिती निफाडकर यांनी दिली.

महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता : महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नूतन कार्यकारिणीने बुधवारी पदभार स्वीकारला. या वेळी उपस्थित (डावीकडून) प्रदीप निफाडकर, स्वाती महाळंक, योगेश सोमण, सुनील महाजन आणि सुनेत्रा मंकणी.

'कार्यभार हस्तांतर झालेला नाही'

- **नूतन कार्यकारिणी मंडळाने पदभार स्वीकारला असला तरी पूर्वीच्या कार्यकारिणीने संस्थेची कागदपत्रे, हिशोबाचा ताळेबंद असा कार्यालयीन कार्यभार हस्तांतर केलेला नाही. याबाबत संबंधितांना पत्र पाठविण्यात आले आहे. निवडणुकीनंतर हसतखेळत ही प्रक्रिया पार पाडावी, अशी आमची इच्छा आहे. त्यामुळे माजी पदाधिकाऱ्यांचा प्रतिसादाची वाट पाहत आहोत, असे योगेश सोमण यांनी सांगितले.**

एनईएस पुणे ईस्ट न्यू ट्रान्समिशन लिमिटेड
(पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडची उपकंपनी १००% संपूर्ण मालकी)
बी-९, कुताब इन्स्टिट्यूशनल एरिया, कतवरिया सराई, नवी दिल्ली-११० ०१६
CIN-U42202DL2025GOI445359

जाहीर सूचना

प्रेषण परवान्याच्या मंजुरीसाठी एनईएस पुणे ईस्ट न्यू ट्रान्समिशन लिमिटेडच्या अर्जावर सूचना/हरकती मागणी
(Case No : 52 of 2026)

१. एनईएस पुणे ईस्ट न्यू ट्रान्समिशन लिमिटेड यांनी इलेक्ट्रिसिटी कायदा २००३ चे कलम १४ आणि १५ आणि एमईआरसी (प्रेषण परवाना अटी) नियमन २००४ च्या तरतुदीअंतर्गत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासमोर प्रेषण परवान्याच्या मंजुरीसाठी अर्ज भरलेला आहे. माननीय आयोगाने ३० मार्च २०२६ रोजी अर्ज दाखल करून घेतला आहे आणि एनईएस पुणे ईस्ट न्यू ट्रान्समिशन लिमिटेड यांना इलेक्ट्रिसिटी कायदा २००३ चे कलम १५ (२) अंतर्गत जाहीर सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.

२. एनईएस पुणे ईस्ट न्यू ट्रान्समिशन लिमिटेड यांनी आगामी भाराच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी आणि सध्याच्या ग्रिड मर्यादा सोडविण्यासाठी 765/400 kV AIS Pune East S/s स्थापन करण्याद्वारे आंतरराज्य प्रेषण प्रणालीच्या मजबुतीकरणासाठी विशेष हेतू वाहनांची नोंदणी केली आहे. प्रकल्प महाराष्ट्र शासनाद्वारे बोली प्रक्रिया समन्वयक म्हणून नमूद, पीएफसी कन्सल्टिंग लिमिटेडद्वारे आयोजित दरांवर आधारित स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे पुरस्कृत आहे.

३. प्रकल्पामध्ये समाविष्ट

अ. क्र.	प्रेषण मालमत्तेचे नाव आणि ठिकाण	लाईन लांबी/ क्षमता	दर	नियोजित सीओडी (अतिरिक्तच्या प्रकरणांमध्ये)
१.	765 kV लेव्हल येथे 1x240 MVAR बस रिॲक्टरसह 2x1500 MVA, 765/400 kV ICT सह एआयएस पुणे ईस्टची स्थापना ➢ 765/400 kV, 1500 MVA, ICT- २ नग. (7x500 MVA सिंगल फेज युनिट एक स्पेअर ICT युनिटच्या समावेशासह) ➢ 240 MVAr, 765 kV बस रिॲक्टर- १ नग (4x80 MVAr सिंगल फेज युनिट एक स्पेअर रिॲक्टर युनिटच्या समावेशासह) • 765 kV ICT bays - २ नग • 400 kV ICT bays - २ नग • 765 kV line bays - ४ नग • 400 kV line bays - ४ नग • 765 kV reactor Bay - १नग **भविष्यातील स्पेस तरतुदी :** ➢ स्वीचेबल लाईन रिॲक्टर्ससह 765 kV लाईन बेज- ०६ नग (Line Bays) ➢ स्वीचेबल लाईन रिॲक्टर्ससह 400 kV लाईन बेज- ०४ नग (Line Bays) ➢ 400 kV स्वीचेबल लाईन रिॲक्टर बेज (Bays)- ०२ नग	3000 MVA 240 MVAR	३६८४.६० कोटी	२४ महिने
२.	765 kV एआयएस पुणे (ईस्ट) येथे 765 kV पुणे (GIS) (शिक्रापूर- PG) (सध्याचे) पासून ते 765 kV पुणे-III (GIS) (प्रस्तावित) 765 kV डी/सी लाईनच्या दोन्ही सर्किट्सचे LILO	१०० किमी		
३.	765 kV AIS पुणे (ईस्ट) पासून 400 kV D/C line ते 400kV AIS कर्जत (सध्याचे) पर्यंत 400 kV डी/सी लाईन	४० किमी		
४.	765 kV AIS पुणे (ईस्ट) पासून ते 400kV AIS लोणीकंद-II (सध्याचे) पर्यंत 400 kV D/C line	१२० किमी		
५.	400kV AIS कर्जत (सध्याचे) आणि 400kV AIS लोणीकंद-II (सध्याचे) येथे 400kV लाईन एंड बेज	400 kV		

४. महाराष्ट्र राज्यामध्ये या आंतरराज्य प्रेषण प्रणालीचा देखभाल आणि स्थापना, कार्यवाहीसाठी प्रेषण परवानाप्राप्त करण्याची आवश्यकता आणि बोली प्रक्रियेसंदर्भात यशस्वी बोलीधारकाद्वारे अर्जदाराचे अधिग्रहण झाले आहे. त्याचबरोबर एनईएस पुणे ईस्ट न्यू ट्रान्समिशन लिमिटेड यांनी प्रेषण परवान्याच्या मंजुरीसाठी अर्ज केला आहे.

५. आयोगाने एनईएस पुणे ईस्ट न्यू ट्रान्समिशन लिमिटेड यांना या सूचनेद्वारे प्रेषण परवान्याच्या मंजुरीसाठी त्यांच्या अर्जावर लोकांकडून सूचना/हरकती मागविण्याचे निर्देश दिले आहेत. खरेदी किंवा तपासणीसाठी अर्जाची प्रत ज्याकडून उपलब्ध होईल अशा नोडल व्यक्तीचा संपर्क तपशील खालीलनुसार :
अ. नाव : श्री. तल्ला हरी प्रसाद, प्रोजेक्ट इनचार्ज
ब. खरेदी किंवा तपासणीसाठी अर्जाची प्रत ज्याकडून उपलब्ध होईल तो पत्ता : कंपनीचे कार्यालय, द्वारे ED (TBCB), पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, सौदामिनी, प्लॉट नं. २, सेक्टर-२९ गुरगाव १२२००१
क. तपासणी किंवा खरेदीसाठीचा वेळ : १०.०० वाजल्यापासून ते १७.०० वाजेपर्यंत कामकाजाच्यादरम्यान
ड. सीडीसह अर्जाच्या कागदपत्रांचा तपशील (इंग्रजी) रोखीमध्ये ₹१०० च्या पेमेंटवर किंवा दिल्ली येथे देय असलेल्या एनईएस पुणे ईस्ट न्यू ट्रान्समिशन लिमिटेडच्या नावे काढलेला डीडी/चेक.
ई. जेथून अर्जाची प्रत मोफत डाउनलोड करता येईल त्या संकेतस्थळाचा पत्ता : **www.powergrid.in/subsidiaries**

६. प्रसिद्ध केलेल्या जाहीर सूचनेला प्रतिसाद म्हणून, ज्या कोणालाही सूचना/ हरकती नोंदवायच्या असल्यास, ते MERC संकेतस्थळावरील **(www.merc.gov.in/e-public-consultation) 'E-Public Consulatation'** टॅबद्वारे इंग्रजी किंवा मराठी भाषेत लेखी स्वरूपात अपलोड करून ते सादर करू शकतात. ही सुविधा वापरण्यात काही अडचण आल्यास, संबंधित व्यक्तीकडे सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० दरम्यान MERC कार्यालय **मोबाईल क्रमांक : ८९२८०७१५२२** किंवा ई-मेल आयडी : **suggestions@merc.gov.in** वर संपर्क साधू शकतील.

७. ज्या व्यक्तीने **'E-Public Consulatation'** टॅबवर सूचना आणि हरकती अपलोड केल्या आहेत, त्यांना त्यांच्या सादरीकरणाची कोणतीही हार्डकॉपी फाईल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीकडे इलेक्ट्रॉनिक माध्यमांची सोय नाही, त्या व्यक्ती त्यांच्या सूचना आणि हरकती हार्डकॉपीमध्ये **'सचिव', महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमईआरसी), १३ वा मजला, सेंटर नं. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४००००५ या पत्त्यावर पाठवू शकतात. सोबत श्री. तल्ला हरी प्रसाद, प्रोजेक्ट इनचार्ज, एनईएस पुणे ईस्ट न्यू ट्रान्समिशन लिमिटेड कंपनीचे कार्यालय द्वारे ईडी (TBCB), पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, सौदामिनी, प्लॉट नं. २, सेक्टर-२९, गुरगाव १२२००१, ई-मेल : regulatory@powergrid.in** यांना सूचना आणि हकरती पाठवल्याचा पुरावा सादर करावा. तसेच, पाठवणाऱ्याचे संपूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेल पत्ता (असल्यास) नमूद करावा. **१ मे २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेनंतर** प्राप्त झालेल्या सूचना आणि/ किंवा हरकतींचा विचार केला जाणार नाही. इतर कोणत्याही माध्यमातून दाखल केलेल्या सूचना/ हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

८. एनईएस पुणे ईस्ट न्यू ट्रान्समिशन लिमिटेड यांनी **१ मे २०२६ पर्यंत** प्राप्त झालेल्या प्रत्येक आक्षेप/ हरकतीला, ते प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत, परंतु **४ मे २०२६** च्या नंतर नाही, उत्तर द्यावे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०१-०४-२०२६

श्री. तल्ला हरी प्रसाद
प्रोजेक्ट इनचार्ज